# राज्य सरकार दिव्यांगांबद्दल गंभीर नाही-बच्चू कडू

## दिव्यांग कल्याण विभाग प्रमुख पदाचा दिला राजीनामा

### सरकारी सुरक्षाही नाकारली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )** - राज्य सरकार दिव्यांगांच्या विविध मागण्यांचा गांभीर्याने विचार करत नसल्याचा आरोप बच्चू कडू यांनी केला आहे. दिव्यांगांकरिता राज्य सरकारविरोधात आंदोलन करायचे असेल तर दिव्यांग कल्याण विभागाच्या प्रमुख पदी राहून ते शक्य होणार नसल्याचे सांगत, माजी मंत्री बच्चू कडू यांनी शुक्रवारी (दि.3) राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या प्रमुख पदाचा राजीनामा दिला.



इतकेच नव्हे तर त्यांनी आपल्याला असलेली सर्व सरकारी सुरक्षाही नाकारली आहे.

बच्चू कडू यांच्या पाठपुराव्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डिसेंबर 2022 मध्ये स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभागाची निर्मितीची घोषणा केली होती. राज्यभर 'दिव्यांगांचे 'मसिहा' अशी ओळख असणाऱ्या बच्चू कडू यांची या विभागाच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली होती.

पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर कडू यांनी दिव्यांगांसाठी विविध उपाययोजना राज्य सरकारला सुचविल्या होत्या, मात्र राज्य शासनाकडून त्याची फारशी दखल घेण्यात आली नाही.

या पदावर राहून आपण दिव्यांगांना न्याय देऊ शकत नाही, त्यांच्यासाठी आपल्यालाच आंदोलन करावी लागणार आहेत, त्यामुळे आपण या पदाचा राजीनामा देणार असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. यासोबतच आपल्याला देण्यात आलेली सरकारी सुरक्षाही काढून टाकण्यात यावी अशी मागणी करून त्यांनी सरकारच्या निष्क्रियतेविषयी आपला संताप व्यक्त केला आहे.

### बच्चू कडूंच्या होत्या या मागण्या

बच्चू कडू यांनी केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये महाराष्ट्रात दिव्यांगांना इतर राज्यांच्या तुलनेत कमी मिळणाऱ्या मानधनात वाढ करावी, मानधन वेळेवर मिळावे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिव्यांगांसाठी राखीव असणारा 5 टक्के निधी योग्यरित्या वापरावा, खात्यासाठी स्वतंत्र मंत्रीपद निर्माण करावे, जिल्ह्यांच्या ठिकाणी स्वतंत्र कार्यालये उभारावीत, आदी मागण्यांचा यामध्ये समावेश होता. मात्र यापैकी कुठलीही मागणी पूर्ण झाली नाही आणि भविष्यात ती पूर्ण होण्याची शक्यताही नसल्याची खंत बच्चू कडू यांनी व्यक्त केली.



# 9 महिन्यात जिल्ह्यात वीजचोरीचे बाराशे प्रकरणे उघडकीस

## 2025 मध्ये वीज चोर महावितरणच्या रडारवर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )-** नऊ महिन्यात महावितरणकडून 1 हजार 184 वीजचोरांवर कारवाई करण्यात आली आहे. कारवाईअंती या ग्राहकांनी 4 कोटी 28 लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे आढळून आले आहे. या सर्वांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, तडजोड शुल्क भरून वीज चोरीची रक्कम न भरणाऱ्या वीज चोरीच्या प्रकरणात कायदेशिर कारवाईला सुरूवात करण्यात आली असल्याची माहिती अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी दिली आहे.

वीजचोरी पकडण्यासाठी महावितरण सातत्याने वीजचोरीविरोधात मोहीम राबविते. महावितरणकडून जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या मोहिमेदरम्यान एप्रिल-2024 ते डिसेंबर -2024 या नऊ महिन्यांत उघडकीस आणलेल्या वीज चोरीच्या प्रकरणामध्ये मीटरमध्ये छेडछाड करणे ,मीटर बंद पाडणे,मीटर दुरून बंद करण्यासाठी रिमोटचा वापर करणे,मीटरच्या मागच्या बाजूने छीद्र पाडत मीटरमध्ये रोध निर्माण करून मीटर बंद पाडणे किंवा मीटरची गती संथ करणे असे अफलातून प्रकार उघडकीस आले आहे. या सर्व ग्राहकांना 4 कोटी 28 लाख रुपयाची वीजचोरीची बिले देण्यात आली होती. त्यापैकी 1 हजार 50 वीज चोरी प्रकरणात तडजोड शुल्कासह 4 कोटी 21 लाखाची वीजबिले भरण्यात आली आहेत.परंतू अजूनही पैसे भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या 134 प्रकरणात कायदेशिर करवाई करण्याची प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. संचालक(संचालन) अरविंद भादीकर यांनी नुकताच अमरावती येथे घेतलेल्या बैठकित वीज चोराविरूध्द होत असलेल्या कारवाईत नाराजी व्यक्त करत मोहिम तीव्र करून वितरण हानी 15 टक्के पर्यंत कमी करण्याचे उद्दीष्ट दिले आहेत.


# महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी समन्वय साधावा- आमदार खोडके



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती (दि.3 )-** आमदार सुलभा खोडके यांनी महापालिकेच्याख विश्वफरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहमध्येय बैठक घेवून विविध विभागांच्याव कामाचा व सद्यास्थितीच्या् आढावा घेतला.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारी अमरावती महानगरपालिका ही अत्येंत महत्वारची स्था निक स्वाराज्य संस्थां आहे. शहरी भागाच्या विकासासाठी व योजनांचा अंमलबजावणीचे मोठे दायीत्व महानगरपालिकेला पार पाडावे लागते. दिवसेंदिवस वाढते शहरीकरण लक्षात घेता नागरिकांना चांगल्याय सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकमुळे अमरावती शहर हे आपले घर ही भावना सर्वांनी मनी बाळगून शहराला नवा आयाम व लौकीक मिळवून देण्यीसाठी सामुहीक प्रयत्नांची गरज असून सर्व यंत्रनांनी संवाद व समन्वय साधून अमरावती महानगरपालिका क्षेत्रात सुखसुविधा निर्माण करण्याजसाठी पुढाकार घ्यानवा असे आवाहन अमरावती विधानसभा मतदार संघाच्यास आमदार सुलभा खोडके यांनी केले. या बैठकीत आमदार सौ.सुलभाताई खोडके यांच्याा समवेत मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यकक्ष संजय खोडके, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पाच नाईक, उपआयुक्त डॉ.मेघना वासनकर, उपआयुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, मनपा झोनस्तारीय अधिकारी, विभागप्रमुख तसेच सर्व सहकारी उपस्थित होते.



# 10 बाल कामगारांची सुटका

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )-** कामगार उप आयुक्त नितीन पाटणकर यांच्या निर्देशानुसार व सहायक कामगार आयुक्त मोसीन सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली बाल व किशोरवयीन कामगार नियमन व निर्मूलन अधिनियम 1986 व सुधारित अधिनियम 2016 अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेद्वारे 10 बालक व किशोरवयीन कामगारांची सुटका करण्यात आली असून दोषींवर कारवाईसाठी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**बाल कामगार मुक्ती अभियान**

ही मोहिम संजय पांडे (दुकान निरीक्षक, अमरावती) यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आली. त्यांच्यासोबत अविकांत चौधरी (दुकान निरीक्षक, अचलपूर), तुषार देशपांडे (दुकान निरीक्षक, मोर्शी), अभिजित साळीवकर (दुकान निरीक्षक, अमरावती), तसेच जिल्हा परिषद अमरावतीचे जिल्हा बाल संरक्षण समन्वयक व महिला कार्यालय अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि चाईल्डलाइन यांनी सहभाग घेतला. या मोहिमेदरम्यान 3 बालक व 7 किशोरवयीन कामगारांची सुटका करण्यात आली. सुटलेल्यांमध्ये परराज्यातून आलेल्या बालकांचाही समावेश होता.

संबंधित मालकाविरोधात बडनेरा पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. कामगार उप आयुक्त नितीन पाटणकर यांनी जनतेला आवाहन केले आहे की, बाल कामगारांना कामावर ठेवू नका. तसेच कोठेही बाल कामगार काम करताना आढळल्यास संबंधित पोलीस ठाणे किंवा त्यांच्या कार्यालयाला कळवावे, जेणेकरून त्वरित कारवाई करता येईल. त्यांनी बालकांनाही आवाहन केले की, शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे व कामाच्या दिशेने जाण्याऐवजी स्वत:च्या भविष्याच्या उभारणीसाठी प्रयत्न करावेत.

# अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

## अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट 2 ची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 3 )-** शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने 3 जानेवारी रोजी दस्तुरनगरातील आदित्य वाईन शॉपजवळ हातात शस्त्र घेवुन दहशत परसविणार्या एका आरोपीला अटक केली. कुणाल विनोद विघ्ने (वय 25, वर्ष रा. दि ग्रेटर कैलास नगर, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून शस्त्र जप्त करण्यात आले आहे. अवैधरित्या शस्त्र बाळगणार्यांवर कारवाई करण्यासंदर्भात पोलीस आयुक्त यांच्या निर्देशीत केले होते. या अनुषंगाने गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या आदेशाने युनिट क्रमांक 2 च्या पथकातील अधिकारी व अंमलदार 3 जानेवारी रोजी पेट्रोलींग करीत होते. दरम्यान गुप्त माहीती मिळाली की, आदित्य वाईन शॉप येथे एक इसम हा हातात शस्त्र घेवुन दहशत पसरवित आहे. या माहीतीवरून पोलिसांनी आदित्य वाईन शॉप येथे जाऊन पाहणी केली असता, तेथे आरोपी कुणाल विनोद विघ्ने हा हातात शस्त्र घेऊन दिसले. त्यामुळे पोलिसांनी त्याला अतिशय शिताफीने ताब्यात घेतले आणि त्याच्या हातातील एक लोखंडी चाकु दोन्ही बाजुला धारदार शस्त्र असलेले व एक रामपुरी चाकु एका बाजुन धारदार शस्त्र असा एकुण 1500 रुपयांचा माल जप्त केला. याप्रकरणात आरोपीविरूध्द फ्रेजरपुरा ठाण्यात कलम 4/25 आर्म ॲक्ट सहकलम 135 महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मानसिक छळाला कंटाळून तरुणाने केले विष प्राशन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.3 )** - मानसिक छळाला कंटाळून एका 30 वर्षीय तरुणाने विष प्राशन केले. त्यामुळे दोन दिवसांच्या उपचारानंतर त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची तक्रार 2 जानेवारी रोजी मृताच्या आईने मोर्शी पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी सागर दिलीप खोपडे (वय 32, रा. हिवरखेड, मोर्शी, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हर्षल गजानन नागापुरे (30, हिवरखेड, मोर्शी) असे मृत तरुणाचे नाव आहे. आईच्या तक्रारीनुसार, 26 डिसेंबर रोजी सायंकाळी 7 वाजता हर्षलची आई तसेच त्यांची सून गावातील रेशन दुकानावर गेल्या होत्या, त्यावेळी आरोपी सागर खोपडे हा दुकानात काम करत होता. त्यावेळी अंगठा कसा लावायचा हे कळत नाही, असे म्हणून, त्याने हर्षलच्या आईशी वाद घातला. त्यानंतर आई हर्षलला रेशन दुकानात घेऊन आली, त्यावेळी सागर खोपडेने हर्षलसोबत वाद घालून त्याला शिवीगाळ केली. तसेच घराचे शौचालय पाडल्याशिवाय सोडणार नाही, आता बघून घेईन, अशी धमकी त्याने हर्षलला त्यामुळे हर्षल घाबरला होता. तो मानसिक तणावाखाली आला. दरम्यान, 26 डिसेंबर रोजी त्यांने या मानसिक तणावातून विष प्राशन केले. ही बाब माहिती होताच कुटुंबीयांनी हर्षलला जिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतू 28 डिसेंबर रोजी उपचारादरम्यान हर्षलचा मृत्यू झाला.


# 100 रुपयांच्या बनावट नोटा चलनात आणणाऱ्याला अटक

## चांदूर रेल्वेच्या आठवडी बाजार येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.3 )** - चांदूर रेल्वे स्थानक परिसरातील आठवडी बाजारात 100 रुपयांच्या बनावट नोटा चलनात आणण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून 7 बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक मोहम्मद सलीम शेख गफूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी आरोपी अंकुश गुलाबराव सोनकुंवर (24, रा. सांगलुवाडा, चांदूर रेल्वे) याला अटक केली आहे.

गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मोहम्मद सलीम शेख गफूर हे चांदूर रेल्वे स्थानक परिसरात गस्त घालत होते. यावेळी एक तरुण भारतीय चलनाच्या सदृश बनावट नोटा बाजारात घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर मोहम्मद सलीम यांनी तत्काळ वरिष्ठांना



माहिती देऊन आठवडी बाजारात छापा टाकून अंकुश सोनकुंवरला अटक केली. त्याची चौकशी करून झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडे 100 रुपयांच्या सात बनावट नोटा सापडल्या. पोलिसांनी एकूण 10 हजार रुपयांच्या 7 बनावट नोटा आणि मोबाईल जप्त केले आहेत. आरोपीला चांदूर रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलिसांनी अंकुश सोनकुंवर याच्याविरुद्ध कलम 179, 180 भादंवि अन्वये गुन्हा दाखल केला आहे. चांदूर रेल्वे पोलीस पुढील तपास करत आहेत.

# नालीत आढळला इसमाचा मृतदेह

**अमरावती-** बडनेरा मार्गावरील राजापेठ स्थित भारतीय महाविद्यालयाच्या बाहेरील नालीमध्ये 3 जानेवारी रोजी सकाळी एका इसमाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. पोलिसांनी अग्निशमनच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून जिल्हा सामान्य रुग्णालयात नेला. मृताची ओळख अद्याप पटली नसून, पोलिस नातेवाईकांचा शोध घेत आहे.

# वर्ष 2025 सेम टू सेम 1947 प्रमाणे!

## सुभाष दाभिरकर यांनी सांगितली 2025 च्या कॅलेंडरची विशेषता

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.3 )-** जुने वर्ष उलटले आणि नववर्ष सुरु झाले की, सर्वांनाच उत्सुकता असते ती नविन वर्षाचे कॅलेंडर बघण्याची. त्यातील सणवार, वाढदिवस व येणाऱ्या सार्वजनिक सुट्या प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा विषय असतो. 2025 हे वर्ष असेच काहीसे मजेशीर आहे. या वर्षातील तारखा व दिवस अगदी 1947 सालच्या कॅलेंडरशी मिळते जुळते अर्थात सेम टू सेम आहे, अशी माहिती तालुक्यातील टेंभुरखेडा येथील प्रख्यात अंकगणित तज्ञ तसेच 3 हजार वर्षांचे कॅलेंडर तोंडपाठ करण्याचा विश्वविक्रम करणारे तसेच क्षणार्धात गणित पुस्तकाचे लेखक सुभाष दाभिरकर यांनी दिली आहे.

15 ऑगस्ट 1947 या आपल्या भारताच्या स्वातंर्त्यदिनाचा दिवस शुक्रवार होता. त्याप्रमाणे सेम याही वर्षी सुध्दा 15 ऑगस्ट 2025 चा दिवस शुक्रवारच आहे. तसेच 1902, 1913, 1919, 1930, 1941, 1947, 1952, 1958, 1969, 1975, 1986, 1997, 2024, 2008, 2003 हे वर्ष सुध्दा 2025 सारखे सेम टू सेम







आहेत. येणाऱ्या वर्षात एप्रिल महिन्यात सलग 3 सुट्या आहेत. एप्रिल 2025 मध्ये 12 एप्रिलला दुसरा शनिवार असल्याने सुटी, 13 ला रविवार व 14 ला सोमवारी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्याने सलग 3 सुट्या आल्या आहेत. जानेवारी आणि जून या दोन महिन्यात एकही शासकीय सुटी नाही. 4 सुट्या रविवारी आल्यामुळे त्यावर संक्रांत आली आहे. यात 26 जानेवारीला प्रजासत्ताक दिन, 30 मार्चला गुढीपाडवा, 6 एप्रिलला रामनवमी व 6 जुलै रोजी मोहरम या चार शासकीय सुट्या रविवारी आल्या आहेत. तसेच 2 ऑक्टोबरला दसरा व महात्मा गांधी जयंती एकाच दिवशी आल्यामुळे या दोन सुट्या बुडाल्या आहेत. येणाऱ्या वर्षातील एकूण 5 सुट्यांवर संक्रात राहणार आहे.

### 14 मार्च ला धुलिवंदन

अंगारक चतुर्थी एकच म्हणजे मंगळवार 12 ऑगस्ट रोजी आलेली आहे. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात 19 ला शिवजयंती व 16 तारखेला महाशिवरात्री असल्याने सुटी आहे. मार्च महिन्यात 14 तारखेला धुलीवंदन, 30 तारखेला गुढीपाडवा, 31 ला रमजान ईद असल्याने 3 सुट्या मार्च महिन्यात आहे. एप्रिल महिन्यामध्ये 6 एप्रिल ला रामनवमी, 10 एप्रिलला महाविर जयंती, 14 एप्रिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, 18 तारखेला गुडफ्रायडे अशा 4 सुट्या एकाच महिन्यात आहे. 25 जुलै पासून श्रावण सोमवार चालु होतात. या महिन्यात एकूण 4 श्रावण सोमवार आले आहे.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, जेलरोड अमरावती**

**निविदा सुचना क्र. ३४ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग अमरावती अंतर्गत निम्न पेढी प्रकल्पा अंतर्गत कुंड सर्जापूर पाणी पुरवठा योजना ता. भातकुली जि. अमरावती (पूर्ण ठेव तत्वावर) (1) Repairs Pure Water Rising Main 100 mm. Dia DIK-9, Supply Well to ESR (2) Repairs to Existing Distribution System या कामाकरीता शासकीय अनुभव प्राप्त एजन्सीकडून ब-१ प्रपत्रात मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

टिप :- सदर निविदेबाबतचा सविस्तर तपशिल कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग जेलरोड, अमरावती या कार्यालयात दि. ०६/०१/२०२५ पासून उपलब्ध राहिल.

(विवेक सोळंके)
कार्यकारी अभियंता

वि.मा.का./अम./जाहि./९५६/२०२४-२०२५



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# हिंदुत्ववादी सत्तेतच मंदिरांच्या कामाला ब्रेक?

## घाटलाडकी येथील तीन कोटी रुपये मंजूर होवूनही तीर्थक्षेत्राचे काम थांबले





**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.3 )-** मागील एका वर्षापासून तीर्थक्षेत्र 'ब' अंतर्गत घाटलाडकी येथील तुळसामाता मंदिर व सभागृह या ठिकाणी बांधकाम व सौंदर्यीकरनाचे काम सुरु होते, तत्कालीन आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात पहिल्या टप्यातील दोन कोटी रुपयाचे काम पूर्ण झाले. दुसऱ्या टप्यातील तीन कोटी रुपयाच्या कामाचे ई टेंडरिंग होऊनही ठेकेदाराला काम मिळाले व रु सर्टिफिकेट मिळाले, परंतु आता अधिकारी कार्यारंभ आदेश देण्यात टाळाटाळ करीत असल्याने पुढील कामात अडथळा निर्माण होत आहे. हिंदुत्ववादी सत्तेतच मंदिरांच्या कामाला ब्रेक लागत असल्याने हे कोणते हिंदुत्व असा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे.

पूर्ण विदर्भात प्रसिद्ध असलेले श्री. संत तुळसामाता देवस्थान गेल्या 60 वर्षा पासून मातेचा पुण्यतिथी सोहळा साजरा करत असतात. या वर्षी सुद्धा फेब्रुवारी मध्ये 7 ते 14 तारखे पर्यंत हा उत्साह साजरा होणार आहे, पुण्यतिथी सोहळ्या अगोदर ही काम पूर्ण व्हावी. परंतु या जागेवर ठेकेदाराचे सर्व कामाचे मटेरियल तसेच पडून असल्याने. पुण्यतिथी सोहळ्यासाठी अडचण निर्माण होणार आहे. या कामाला विलंब का असा प्रश्न जनसामान्यात निर्माण झाला आहे, या प्रश्नाचा उलगडा व्हावा. या कामाला लवकरच सुरुवात व्हावी, याकरिता घाटलाडकी येथील शिव फाउंडेशन च्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. कामाला लवकरात लवकर सुरवात करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा मोठे आंदोलन करण्याचा इशारा संबंधित प्रशासनाला देण्यात आला. यावेळी शिव फाउंडेशन अध्यक्ष अमितसिह पवार, विकास माथने, सागर कपले, रोशन जयसिंगपूरे, मनोज बारस्कर, गोलू खाडगळे, मयूर खाडगळे, मंगेश तायडे, अनिल निभोरकर, विक्रम फुकट, रुपेश धोटे, नितीन खाजोने, गणेश पकडे, प्रमोद ताटस्कर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"बच्चू कडू यांनी घाटलाडकी गावातील श्री संत तुळसामाता संस्थानला तीर्थक्षेत्र ब चा दर्जा प्राप्त करून दिला. त्या अंतर्गतच पाच कोटी रुपयांची कामे मंजूर करून घेतली. पण अचानकच निवडणूक संपताच या कामाला ब्रेक लागला. केंद्रात व महाराष्ट्रात हिंदूत्ववादी सरकार असताना हिंदूच्याच मंदिर सौंदर्यीकरणाच्या व इतर होत असलेल्या कामाला अचानक ब्रेक का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. या कामाला लवकरात लवकर सुरवात करावी, अन्यथा आम्ही यासाठी मोठे आंदोलन करू..

**अमित पवार**
**-अध्यक्ष शिवफाउंडेशन घाटलाडकी**

# जि.प.शिक्षकांची बदली रोखण्यासाठी एकवटले अडूळाबाजार गावकरी

## निवेदनातून प्रशासनाला घातले साकडे



"आजच्या स्पर्धेच्या युगात गावागावांतील विद्यार्थी व पालक कॉन्व्हेन्ट संस्कृतीच्या मागे धावत आहेत. ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी शहरात शिक्षणाला जात आहे. या स्पर्धेच्या काळात जिल्हा परिषद शाळा ओस पडत आहेत. याला जबाबदार शासनाचे चुकीचे धोरण जबाबदार आहे. जिल्हा परिषद शाळेला योग्य न्याय दिला तर ग्रामीण भागातील विद्यार्थी गावातच शिकतील यासाठी आम्ही गावकरी प्रयत्न करत आहे. या शाळेत असणारे शिक्षक अतिशय प्रामाणिकपणे शिकवत असून त्यांची बदली झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, तरी त्यांची बदली रद्द करावी ही आमची शिक्षण विभागाला विनंती आहे.

**अंकुश खंडारे**
**सरपंच ग्राम पंचायत अडूळा बाजार**

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.3 ) –** जिल्हा परिषदेच्या शाळा सोडून शहराकडील इंग्रजी शाळांमध्ये धाव घेणाऱ्यांचा लोंढा आताच्या घडीला पहायला मिळते. या उलट जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांची बदली रोखण्यासाठी गावकऱ्यांनी एकत्र यावे, अश्या घटना क्वचितच पहायला मिळतात. तालुक्यातील अडूळा बाजार येथील गावकरी गावातील जिल्हा परिषद शिक्षकांची बदली रोखण्याकरित एकवटले असून त्यांनी शिक्षक प्रकाश लिंगोट यांची बदली रोखण्याकरिता प्रशासनाला साकडे घातले आहे.

गावकरी, पालकांनी ग्रामपंचायत सरपंच अंकुश खंडारे यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्हा परिषद शिक्षण विभाग व राज्य शासनाला निवेदन देत बदली रोखण्याची मागणी केली आहे. सदर निवेदनात म्हटले की, पालकांच्या विनंतीवरुन दि.31 डिसेंबर 2024 रोजी अडुळा बाजार ग्रामसभेने शिक्षक प्रकाश लिंगोट यांची बदली थांबविण्याचा ठराव पारीत केला.

प्रशासनाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवु नये व जि.प. शाळेच्या पटावरील संख्या कमी होवु नये व जिल्हा परिषद शाळेचा शैक्षणिक स्तर वाढवा याकरीता प्रशासनाने या बाबींवर गांभीर्यपूर्वक लक्ष देवून संबंधित शिक्षकाची बदली शासन स्तरावरुन थांबवावी व पालक वर्गाची रास्त मागणी ऐकुण घ्यावी, असे मत गावकऱ्यांनी व्यक्त केले आहे.

# उदखेड येथे 'बालिका दिन' साजरा

## विविध उपक्रमासह सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.3 )–** जि.प. प्राथमिक शाळा उदखेड येथे दि.3 रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमांमध्ये कांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.


आयोजित कार्यक्रमाचे स्वरा भोयर हिने 'मी सावित्री बोलतेय' या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण केले. विद्यार्थ्याकरीता विविध वेषभूषा स्पर्धा, वकृत्व स्पर्धा साहित्य प्रदर्शनी इत्यादींचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला सर्व पालक अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी उपस्थित होत्या. तसेच आयोजन शाळेच्या सहाय्यक शिक्षका सोनाली पांडे यांनी केले तर सर्व पालकांचे आभार मुख्याध्यापक अभय मुळे यांनी मानले.

## 14 वर्षीय अल्पवयीन मुलगी गर्भवती

**अमरावती –** पथ्रोट पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 14 वर्षीय अल्पवयीन मुलासोबत 19 वर्षीय तरुणाचे वारंवार शारीरिक संबंध होते. त्यामुळे ती 7 महिन्यांची गर्भवती राहिली. महिलेच्या कुटुंबीयांच्या तक्रारीवरून पथ्रोट पोलिसांनी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# रायगड प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्यांना रब्बी हंगामाकरिता द्या!

## राजुरा ग्रामपंचायत सदस्य भुषण काळे यांची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.3 )-** रायगड प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्यांना रब्बी हंगामाकरिता उपलब्ध करून द्या, या मागणीचे निवेदन राजुरा ग्रा.पं. सदस्य भुषण काळेंच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अधिकारी यांना दिले.

चांदूर रेल्वे तालुक्यातील रायगड पी.डी.एन. प्रकल्पाचे काम जवळपास दीड ते दोन वर्षांपासुन पुर्णत्वास झालेले आहे. मात्र अद्यापही ऊर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाने तालुक्यातील धानोरा मोगल, सावंगी, एकपाळा, राजुरा, बोरी, किरजवळा, धोत्रा, मोगरा या 8 गावातील 1300 हेक्टर जमिनीवरील शेतकऱ्यांना रब्बी हंगामाचे पीक उत्पादन करण्याकरिता पाणी सोडलेले नाही. या विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे शेतकरी रायगड पी.डी.एन. प्रकल्पाच्या पाण्यापासून अद्यापही वंचित राहिलेले आहे. या प्रकल्पाचे काम जेव्हा पुर्ण झाले, तेव्हापासुन या पाईपलाईन मेंटनन्स कामाची 5 वर्षाची जबाबदारी कंपनीला दिलेली आहे, परंतु गेल्या दीड ते दोन वर्षांपासुन कंपनीला कुठलेही मेंटनन्सचे काम करण्याचे काम पडलेले नाही आणि शेतकऱ्यांना पाणी सुद्धा मिळालेले नाही. तरी शेतकऱ्यांना त्वरित पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी जिल्हाधिकारी व उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग अमरावतीचे अधिक्षक व कार्यकारी अभियंता, एसडीओ यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन देतेवेळी ग्रा.पं. सदस्य भुषण शिवदासराव काळे, शेतकरी रवींद्र, पाचपोर, प्रशांत काळमेघ, बंटी अजमिरे, अविनाश काळमेघ, विनायक साबळे, दिनेश गजभिये, मंगेश खडतकर, सर्वेश सुर्यवंशी, अर्पित काळे, प्रीतम चव्हाण, आशुतोष काळे, संदीप कावळे, प्रशांत कातकिडे, प्रशांत पाचपोर, रवींद्र गजभिये, सुदर्शन धारणे, प्रणव माहुले, तेजस मूनकर, अनिल काळमेघ, अविस काळे, अभिजित पाचपोर, शुभम काकडे यांसह असंख्य शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# चांदूर रेल्वे शहरातील रेल्वे उड्डाणपुल तत्काळ सुरू करावा!

## अन्यथा 26 जानेवारीला नागरिक स्वतःच सुरू करणार उड्डाणपुल

### रेल रोको कृती समितीचा इशारा



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.3 )-**काम पुर्ण झाल्यावरही चांदूर रेल्वे शहरातील शिवाजी नगर परिसरातील रेल्वे रूळावरील उड्डानपुल अजुनही नागरिकांच्या सेवेत सुरू झालेला नाही. त्यामुळे सदर उड्डाणपुल तत्काळ सुरू करावा अन्यथा 26 जानेवारीला नागरिक स्वतःच उड्डाणपुल सुरू करणार असल्याचा इशारा रेल रोको कृती समिती, चांदूर रेल्वेचे अध्यक्ष नितीन गवळी यांच्या नेतृत्वात दिला असुन याबाबतचे निवेदन शुक्रवारी (ता. 3) रेल्वे विभाग, बांधकाम विभागाला दिले आहे.

शिवाजी नगर परिसरातील उड्डाणपुलाचे बांधकाम शंभर टक्के पूर्ण झालेले आहे. वाहतुकीची चाचणी सुद्धा घेण्यात आली. परंतु अद्यापपावेतो सदर पूल जनतेच्या सेवेत खुला करण्यात आलेला नाही. या पुलाचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित असतांना आधीच 7 – 8 वर्ष कामास वेळ लागला. त्यामुळे जनतेला अत्यंत कठीण समस्यामधून जावे लागत आहे. एसटी बसेसचा मार्ग वाढल्याने बस दर सुद्धा वाढविण्यात आलेत, तो ही आर्थिक भुर्दंड जनतेला सोसावा लागला. मात्र आता पुलाचे काम पूर्ण झाल्यावरही राजकीय नेत्यांच्या उपस्थितीत उद्घाटनाकरिता जनतेला प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे आता संबंधित विभागाचे या पुलाचे तत्काळ लोकार्पण करावे अन्यथा कोणतीही पुर्वसुचना न देता आम्ही स्वतःच समस्त नागरिक हा पुल सुरू करू अशा इशारा रेल रोको कृती समिती ने दिला आहे. निवेदन देतेवेळी रेल रोको कृती समितीचे अध्यक्ष नितीन गवळी, सदस्य विनोद जोशी, बंडूभाऊ यादव, सतीश चौधरी, हर्षल वाघ, मेहमुद हुसैन, गजानन यादव, शशिकांत गाडेकर, सुभाष यादव, भीमराव खलाटे, विनोद लहाने यांसह अनेकांची उपस्थिती होती.

# सावंत फिजिक्स ॲकेडमीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा




**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि.3 )–** तालुक्यातील फिजिक्स विषयासाठी नामांकित असलेली सावंत फिजिक्स ॲकडमी च्या वर्ग 12 वी च्या विद्यार्थ्यांचा नुकताच निरोप व गुणगौरव सोहळा दि.28 डिसेंबर 2024 ला वरूडमधील श्रद्धा राधा हॉल येथे पार पडला.

या कार्यक्रमाचे अतिथी म्हणून वरूड शहरातील प्रा.डॉ.युवराज तामगाडगे आणि डॉ. आशिष काळे, तसेच सावंत फिजिक्स अकॅडमी संचालक स्वप्नील रमेशराव सावंत हे उपस्थित होते. अतिथींनी मुलांना अभ्यासबद्दल मार्गदर्शन करून समोरील येणाऱ्या बोर्ड परीक्षेसाठी तसेच सीएटी, नीट, जेईई परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आणि मेडिकल इंजिनिअरिंग प्रशासकीय क्षेत्रात असणाऱ्या अभ्यासक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे फेब्रुवारी 2024 मध्ये झालेली बोर्ड परीक्षा आणि एप्रिल मध्ये झालेली सीएटी परीक्षेत मुलांनी प्रावीण्य प्राप्त केले, अशा मुलांचा सत्कार सावंत फिजिक्स अकॅडमी तर्फे घेण्यात आला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि गौरव चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकून अनुज्ञप्ती रद्द करा!

## गौरखेडा कुंभी ग्रामस्थांची मागणी ■ बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिले निवेदन





**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.3 )-** 'गौरखेडा कुंभी येथील रस्त्याच्या कामात कोट्यवधी रुपयांची अनियमितता' या मथळ्याखाली दैनिक महासागर ने आपल्या 27 डिसेंबरच्या अंकात वृत्त प्रकाशित करताच या बातमीची दखल सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी घेतली आहे. यासोबत गौरखेडा कुंभी येथील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता यांना निवेदन सादर केले. यावेळी जबाबदार असलेले बांधकाम ठेकेदारांचे देयक थांबवावे, तसेच सदर कंत्राटदाराची अनुज्ञप्ती रद्द करण्याची मागणी स्थानिक युवा कार्यकर्ते नितीन शिंदे यांच्यासह नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

ग्रामस्थांनी निवेदनात सांगितले की, आमदार निधीतून 25/15 या हेड खाली सदर रस्त्याचे बांधकाम झाले असून त्यावर लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. नर्सरी ते हनुमान मंदिरपर्यंत आणि पॅनेशिया ते पाण्याची टाकीपर्यंत दोन्ही रस्त्याचे सिमेंट बांधकाम करण्यात आले आहे. सदर रस्ते बांधकामात करताना बांधकामाची माहिती देणारा फलक जाणीवपूर्वक लावण्यात आले नाही. या रस्ता बांधकामाची माहिती जाणून घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग अचलपूरला माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागण्यात आली. मात्र अद्यापपर्यंत शिंदे यांना माहिती पुरविण्यात आली नाही. त्यामुळे सदर रस्त्याच्या बांधकामावर किती निधी प्राप्त झाला, पैकी किती खर्च करण्यात करण्यात आला, रस्त्याचे प्राकलन, रस्त्याची लांबी, रुंदी आणि जाडी तसेच बांधकाम विभागाने घेतलेले रस्त्याचे मोजमाप याबाबत काहीच माहिती नाही. उल्लेखनीय म्हणजे सदर रस्ता वाहतुकीसाठी खुला झाल्यावर काही दिवसातच रस्त्याला फार मोठे जागोजागी तडे गेले आहे. रस्त्यावरील सिमेंटची धूळ उडू लागली आहे. याप्रकरणी सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई होईपर्यंत रस्ता बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराचे देयक काढू नये, सदर ठेकेदाराची अनुज्ञप्ती रद्द करावी आणि रस्त्याचं कामं चालू असलेल्या जागी खर्चाबाबत फलक लावावा, अशी मागणी नितीन शिंदे यांनी केली आहे. या रस्त्याबाबत सखोल चौकशी करण्यात येईल, असं आश्वासन याप्रसंगी कार्यकारी अभियंता यांनी दिले. निवेदन देताना यावेळी प्रमोद कुटे, हरीभाऊ नांदुरकर, प्रशांत दरेकर, श्रीधर गिरी, संतोष भालेरावसह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.



# स्व.माणिकलाल गांधी जागृत विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.3 ) –** स्त्री शिक्षणाची प्रणेती क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्थानिक स्व.माणिक लाल गांधी जागृती विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजुरा बाजार येथील जि.प.प्राथमिक केंद्र शाळेच्या मुख्याध्यापिका सोनाली धोटे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. मुलींनी स्वतःचे आयुष्य चांगले जगावे संस्कारक्षम जडणघडण शिक्षण शाळा कुटुंब आणि समाज यापासून तयार करून स्वावलंबी व्हावेत असे सांगितले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक विजय आडे, पर्यवेक्षक प्रदीप पाटील, उपमुख्याध्यापक विजय गजबे, उप प्राचार्या मंदा चौधरी तसेच ज्येष्ठ शिक्षक अजय भागवतकर व प्रवीण बोहरूपी यांनी फोटोंचे पूजन केले.

याप्रसंगी सावित्री बाई फुले यांच्या वेशभूषेत वर्ग 7 अ ची लावण्या खराळकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वेशभूषेत वर्ग 7 अ चा उद्देश बुवाडे आणि हिमांशू टेकाडे, कार्तिक वानखडे, भावेश टाकरखेडे, सोहम ढोबळे, दुर्गेश नेहारे, दर्शिल टाकरखेडे, चिराग कांडलकर यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थिती नुसार भोंदूगिरीची वेशभूषा करून लक्षवेधक प्रबोधनपर नाटिका सादर केल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैशाली बोंडे, संचलन निधी दवंडे व अनन्या बरडे यांनी तर आभार प्रदर्शन निकम ने केले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता मिनल नागले, ममता ठाकरे, माधुरी गायकवाड यांनी विशेष प्रयत्न केले.